**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १७/२०२१</u>**

निशाण क्र. ०१ लगत

**<u>पडताळणी</u>**

माझे नाव – प्रमोद सखाराम नवले, वय ६३ वर्षे, धंदा – शेती , रा. महाळुंगे ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग. शपथपुर्वक कथन करतो की,

स.नं. ४७/६ ही जमीन आम्हा १४ लोकांची सामाईक जमिन आहे. सन २०२१ मध्ये सदर सव्र्हे नंबर ७/१२ पाहिला असता सदरचा उतारा निळकंठ वसंत धुरी याच्या नावावर दिसला. आमची नावे दिसली नाहीत. त्यामुळे आम्ही पोलीस स्टेशन येथे तक्रार केली. तलाठी यांनी सांगितले की, खरेदीखताची नक्कल काढा त्यावरुन तुम्हाला खरेदी कोणी केली हे लक्षात येईल. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला बनावट खरेदी झाल्याबाबत तक्रार दिली. पोलीसांनी आम्हाला कोर्टात जाण्यास सांगितले. त्यामुळे मी सदरची फिर्याद दाखल केली आहे. खरेदीखतानुसार दिपक महादेव परब याने निळकंठ वसंत धुरी याला जमिन विकली आहे. त्यात आमची सही नव्हती. त्यामध्ये सुरेखा सुरेश नवले या स्त्रीचा फोटो नसून दुस–याच स्त्रीचा फोटो आहे. तसेच अनिल आत्माराम नवले याच्या ऐवजी दुस–याच व्यक्तीचा फोटो आहे. दिपक परब हा आमच्या वंशावळीतील नाही. दिपक परब याला आम्ही कोणतेही मुखत्यारपत्र दिलेले नव्हते. खरेदीपत्रामध्ये खोटे मुखत्यारपत्र जोडले आहे. त्यामुळे आरोपीला शिक्षा मिळावी अशी माझी मागणी आहे.

येणेप्रमाणे जबाब.

दि. १५/०६/२०२३ समक्ष,

________

फिर्यादीची सही.

( श्रीमती एन.बी.घाटगे )
न्यायदंडाधिकारी वर्ग,१ देवगड